महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ३०

# महाराजा सयाजीराव आणि मराठी पत्रकारिता

सौरभ गायकवाड



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ३०

# महाराजा सयाजीराव आणि मराठी पत्रकारिता

सौरभ गायकवाड

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव
आणि मराठी पत्रकारिता
इतिहास
सौरभ गायकवाड
●
प्रकाशन क्रमांक - ५०
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : सौरभ गायकवाड,
महाडीक कॉलनी, टोप,
ता. हातकणंगले, जि कोल्हापूर,
पिन कोड – ४१६११२२
मो. ९१७५००१८६२
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : २६ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# मराठी पत्रकारिता

'वृत्तपत्रांचा इतिहास हा जनतेचा आणि चळवळींचा इतिहास असतो. वृत्तपत्रे समाजिकीकरणाच्या प्रक्रियेला गती देतात. त्याद्वारे लोकांना सामाजिक संकेत, कार्यात्मक भूमिका आणि मूल्ये याबाबतचे शिक्षण दिले जाते' असे मत माध्यमतज्ज्ञ ए. ए. बर्जर यांनी मांडले आहे. प्रसार माध्यमांच्या विकासाच्या टप्प्यांचा आढावा घेतला तर वृत्तपत्र हे यातील मूलभूत माध्यम म्हणून गणले आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून वृत्तपत्रांना स्थान दिले जाते. स्वातंत्र्य चळवळीत राजकीय भान निर्माण करणाऱ्या आणि सामाजिक बदलांसाठी आग्रही राहणाऱ्या वृत्तपत्रांपासून ते आजची '२४ x ७' चालणारी पत्रकारिता, पेनपासून कॉम्प्यु टरपर्यंत, खिळे जुळवण्यापासून ते डिजिटल प्रिंटिंगपर्यंत, टी व्ही चॅनेल्सपासून ते हातातल्या मोबाईलवर वेळोवेळी येणारे अपडेट्सपर्यंत अशा अमूलाग्र बदलांमधून पत्रकारितेचा प्रवास सुरू आहे. हा प्रवास असाच वेगाने पुढेही अविरतपणे सुरू राहील.

पत्रकारितेमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारतीय राज्यघटनेच्या प्रास्ताविकेत सर्व भारतीय नागरिकांना 'विचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य' असल्याचे स्पष्ट केले आहे हे आपण जाणतोच. परंतु आज भारतात अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी होत असल्याचे वास्तव आपण दररोज अनुभवत आहोत. एकूणच माध्यमांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य मृगजळासारखे बनले आहे. या पार्श्वभूमीवर एकांगी लढा देणारे आणि आपली भूमिका सत्यनिष्ठपणे सातत्याने मांडणारे रविश कुमार यांच्यासारखे दुर्मिळ पत्रकार आज अपवादाने आढळतात.

राजेशाही शासनव्यवस्थेत महाराजा सयाजीरावांनी पत्रकारितेच्या माध्यमातून लोकशाहीची केलेली जोपासना मानदंड निर्माण करणारी आहे. बडोद्यातील वर्तमानपत्रांची भूमिका तपासली असता 'राजाला आवडेल ते' या धोरणाला छेद देत 'जनतेच्या इच्छा आकांक्षा राजापर्यंत पोहोचविण्याचे माध्यम' हीच भूमिका 'बडोदावत्सल', 'सयाजीविजय' आणि 'जागृति' या तत्कालीन बडोद्यातील प्रमुख वृत्तपत्रांनी बजाविली असल्याचे दिसते. विशेष म्हणजे ही तिन्हीही वृत्तपत्रे सत्यशोधकीय विचारधारेची होती. अतिशय अल्प मराठी भाषक असणाऱ्या बडोद्यासारख्या गुजराथी संस्थानात या तीन मराठी

वृत्तपत्रांनी बजावलेली भूमिका आजच्या लोकशाही भारतातही अपवादाने आढळेल इतकी आदर्श होती. हे सर्व सयाजीरावांच्या वैश्विक, मानवतावादी, सर्वसमावेशक आणि जनकल्याणकारी तत्त्वज्ञानाच्या अधिष्ठानामुळेच शक्य झाले.

## सर्वसमावेशक सयाजीराव

महाराजा सयाजीराव गायकवाड हे अतिशय दूरदृष्टीचे आणि गुणग्राहक राज्यकर्ते होते. त्यांनी आपल्या कारकीर्दीत अनेक गुणवानलोकांनाराजाश्रयदिलाआणित्यांच्याकडूनजनहिताची मोठी कामे करून घेतली. महाराजांच्या प्रजावात्सल्य व विद्यासक्तीमुळे संस्थानात वर्तमानपत्रांचा प्रसार वाढला होता. सयाजीरावांनी सर्व विचारसरणींच्या पत्रकारांना पूर्ण स्वातंत्र्य दिले होते. राजा आणि प्रजा या उभयतांच्या कल्याणासाठी त्यांना अधिक सवलती व स्वातंत्र्य देण्याची आवश्यकता सयाजीरावांनी ओळखली होती. महाराज आपल्या विरोधी मते असणाऱ्यांचादेखील स्वीकार करत. संवेदनशील विषयाबाबत तज्ज्ञांशी सविस्तर सल्लामसलत करत, प्रसंगी विशेष समिती स्थापन करत आणि मगच निर्णय घेत. परिणामी एक वैचारिक संवादाचे निखळ वातावरण महाराजांच्या कारकीर्दीत बडोदा संस्थानात निर्माण झाले. या संदर्भात ‘नवगुजरात’ साप्ताहिकाचे चिमणलाल एम. डॉक्टर यांचा अनुभव महाराजांच्या धोरणाला पूरक आहे. चिमणलाल म्हणतात, “मी ‘नवगुजरात’ साप्ताहिक

१९२३ च्या ऑगस्टपासून ते १९४४ च्या जुलैपर्यंत २१ वर्षे चालविले. ते स्वतंत्र राष्ट्रीय लोकशाही साप्ताहिक असल्याने त्याला गुजरात काठियावाड तसेच राजस्थानच्या इतर राज्यात प्रकाशित करता आले नसते. सयाजीरावांच्या उदार राष्ट्रीय राजनीतीमुळे ते २१ वर्षांपर्यंत निर्विघ्नपणे चालविता आले.”

याच राष्ट्रीय कार्यास पाठिंब्याच्या भूमिकेतून १९०४ मध्ये सयाजीरावांनी पुणे येथील ‘गायकवाड वाडा’ बाळ गंगाधर टिळकांना केसरी व मराठा वृत्तपत्रांसाठी भेट दिला. परंतु ब्रिटिश रेसिडेंटचा याला विरोध होता. त्यामुळे ब्रिटिशांच्या डोळ्यात धूळ फेकण्यासाठी १५,४०० रुपयास व्यवहार झाल्याचे कागदोपत्री दाखवले. सध्या हा ‘गायकवाड वाडा’ ‘केसरी वाडा’ म्हणून ओळखला जातो.

## बडोद्यातील नियतकालिके

सयाजीरावांनी सत्यशोधक विचारप्रवाहातून निघणाऱ्या बडोदावत्सल, श्री सयाजीविजय, जागृति या नियतकालिकांना पाठबळ देत सत्यशोधक चळवळीला पूरक भूमिका घेतली. हा काही योगायोग नव्हता. सयाजीरावांनी सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीला सक्रिय पाठिंबा दिला. बडोदा संस्थानात बडोदा गॅझेट, हिंदविजय, नवसारी प्रकाश, भारतमित्र इ. वर्तमानपत्रे विस्तारली होती. १८८५ साली ‘विविधकलाविस्तार’, १८८७

साली ‘धनुष्य’, १८९३-९४ साली अमृत सखाराम वणीकर यांचे ‘बालांकुर’, जगन्नाथ विष्णू दामले व डॉ. गंगाधर बाळकृष्ण परांजपे यांचे ‘धंदेशिक्षक’ व माधव मैराळ सुरतकर यांचे ‘कलाशिक्षण’ इ. मासिके निघत असत. यापैकी ‘बालांकुर’ हे मासिक ८-१० वर्षे नियमितपणे सुरू होते.

यानंतर १९१० च्या दरम्यान ‘रसिकविहार’ नावाचे मासिक सुरू होते. १९१३ मध्ये जनार्दन सखाराम कुडाळकर यांचे ‘लायब्ररी मिसलेनी’, १९१४ मध्ये ‘व्यायाम’, १९२२ मध्ये सहविचारिणी सभेचे ‘सहविचार’ इ. विविध नियतकालिके बडोद्यात सुरू होती. ‘लायब्ररी मिसलेनी’ हे त्रैमासिक ७ वर्षे उत्तमप्रकारे सुरू होते. मात्र पुढे कुडाळकरांच्या अकाली निधनामुळे या त्रैमासिकाचे कामकाज रखडले गेले. यातील ‘व्यायाम’ आणि ‘सहविचार’ ही’ दोन मासिके मात्र सर्वाधिक काळ सुरू होती. याचबरोबर विद्याकल्पतरू, विचारसागर, देशभक्त, फत्तेसिंह गॅझेट, चंद्रशेखर इ. या विविध दैनिकांचा व मासिकांचा उदयास्त होत राहिला.

## बडोद्यातील पहिले वर्तमानपत्र

तत्कालीन बडोद्याचे रेसिडेंट कर्नल फेअर यांच्यावर विषप्रयोग केल्याप्रकरणी मल्हारराव महाराजांची चौकशी करण्यासाठी इंग्रज सरकारने कमिशन नेमले होते. या कमिशनच्या कार्यवाहीचे वार्तांकन करण्यासाठी मुंबईतील

वर्तमानपत्रांचे प्रतिनिधी म्हणून गोविंद बाबाजी जोशी बडोद्याला गेले. कमिशनच्या कामकाजाची लोकांना माहिती व्हावी यासाठी त्यांनी मराठीतून वर्तमानपत्र छापण्यास सुरुवात केली. अच्युत अनंत चिपळूणकर यांनी आपल्या खाजगी छापखान्यात हे वर्तमानपत्र मोफत छापून दिल्याची आठवण गोविंद जोशी यांनी आपल्या माझ्या प्रवासाची हकिकत या पुस्तकात नोंदवली आहे. हे वर्तमानपत्र जरी चारच दिवस चालले असले तरी हे बडोद्यातील पहिले वर्तमानपत्र असल्याचे मत गणेश रंगनाथ दंडवते यांनी 'बडोद्याचे मराठी साहित्य' या ग्रंथात नोंदविले आहे.

## बडोदावत्सल साप्ताहिक

१८८१ मध्ये ज्या वर्षी सयाजीरावांना अधिकार प्राप्त झाले त्याच वर्षी रामजी संतुजी आवटे आणि दामोदर सावळाराम यंदे या दोन सत्यशोधकांनी मुंबई येथे 'शेतकऱ्यांचा कैवारी' या नावाचे साप्ताहिक सुरू केले. शेतकरीवर्ग सुशिक्षित व सुखी व्हावा आणि शेतकऱ्यांच्या अडचणी जगापुढे मांडता याव्यात या उद्देशाने हे साप्ताहिक सुरू केले होते. या साप्ताहिकाचे यंदे संपादक होते. या पत्रात शेतकरी आणि मागासलेल्या जातींच्या सुधारणेसंदर्भात लेखन प्रकाशित होत होते. सोप्या भाषेत लिहिलेले या साप्ताहिकातील लेख सयाजीराव महाराजांना आवडत असत. या दरम्यान डॉक्टर शिवाप्पा हे महाराजांचे

खाजगी डॉक्टर होते. त्यांच्याकडे महाराजांनी इच्छा व्यक्त केली की यंदे यांनी बडोद्यास यावे आणि स्वतंत्र विचाराचे वर्तमानपत्र सुरू करावे. त्यानुसार डॉक्टर शिवाप्पा यांनी यंदे यांची भेट घेतली आणि यंदे यांना बडोद्यास बोलावून घेतले. पहिल्याच भेटीत यंदेंनी सयाजीराव महाराजांच्या इच्छेनुसार असे वृत्तपत्र सुरू करण्यास सकारात्मक भूमिका दर्शवली.

१८८३ मध्ये सत्यशोधक रामचंद्र विठोबा धामणस्कर हे बडोदा संस्थानात नोकरीस आल्यानंतर महाराज आणि धामणस्करांमध्ये सत्यशोधक तत्त्वज्ञानावर विचारविनिमय होत असे. १८८४ ला रामचंद्र धामणस्कर यांना मामा परमानंदांच्या शिफारशीवरून महाराजांनी बडोदा संस्थानच्या प्रशासनात सरसुभे या पदावर नियुक्त केले. सयाजीरावांना आपल्या राज्यात एखादे दर्जेदार वृतपत्र असावे असे वाटत होते. त्यानुसार दिवाण रामचंद्र धामणस्कर यांनी रामजी संतुजी आवटे यांची या कामी निवड केली. त्यानुसार आवटे आणि यंदे या दोघांनी ‘बडोदावत्सल’ हा छापखाना बडोदा येथे सुरू करून ११ ऑक्टोबर १८८५ ला विजयादशमीच्या मुहूर्तावर ‘बडोदावत्सल’ हे साप्ताहिक सुरू केले. हे दर रविवारी प्रकाशित होई आणि मराठी, गुजराथी व हिंदी या तीन भाषेत यातील मजकूर येई. या पत्रात येणारे सर्व लेख महाराज नियमित वाचत असत आणि

त्यात काही सूचना किंवा लोकांचे प्रश्न निदर्शनास आल्यास त्यासंबंधी स्वत: चौकशी करून त्याची अंमलबजावणी करत असत. त्यामुळे लोकांमध्ये बडोदावत्सलविषयी आदर आणि आकर्षण निर्माण झाले.

रामय्या व्यंकय्या अय्यावारू यांनी लिहिलेल्या 'ईश्वरास प्रार्थना' या पुस्तकाचा प्रथम परिचय या पत्राने करून दिला. यंदे आणि आवटे दोघेही सत्यशोधक असल्याने या बडोदावत्सलमधून सत्यशोधकीय विचारांचा प्रचार-प्रसार सातत्याने करत होते. जोतीराव फुले यांच्या निधनानंतर बडोदावत्सलने जोतीरावांना ७ डिसेंबर १८९० रोजी 'हिंदुस्थानातील मार्टिन ल्युथर' म्हणून श्रद्धांजली अर्पित केली होती. यावेळी लिहिलेल्या मृत्युलेखात फुल्यांचे समग्र वाङ्मय प्रकाशित करण्याची सर्वप्रथम मागणी बडोदावत्सलने केली होती. पुढे ७९ वर्षांनी १९६९ मध्ये महाराष्ट्र शासनाने फुल्यांचे समग्र वाड्मय प्रकाशित केले. याच बडोदावत्सल प्रेसने १८९२ मध्ये सावित्रीबाईंचा भाषणसंग्रह छापला होता. महात्मा फुलेंच्या मृत्यूनंतर २४ मे १८९१ रोजी सत्यशोधक समाजाचे नामांतर सत्यधर्म समाज असे करण्यात आले. या नव्या सत्यधर्म समाजाचे 'सत्यप्रकाश' या नावाने मुखपत्र सुरू करण्यात आले होते. या सत्यप्रकाश मुखपत्रासाठी महाराजांनी आर्थिक साहाय्य केले होते.

## श्रीसयाजीविजय साप्ताहिक

दामोदर सावळाराम यंदे आणि रामजी संतुजी आवटे ‘बडोदावत्सल’च्या कामातून वेगळे झाल्यानंतर यंदेंनी महाराजांच्या परवानगीने १८९२ मध्ये ‘श्री सयाजीविजय’ हे नवे साप्ताहिक ३१ नोव्हेंबर १८९३ रोजी सुरू केले. या साप्ताहिकाचे संपादक दामोदर सावळाराम यंदेच होते. हे साप्ताहिक सुरू करताना दिलेल्या पुढील जाहिरातीवरून या साप्ताहिकाच्या उद्देशाची कल्पना येते. या जाहिरातीचा मजकूर असा होता की, “श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज गायकवाड सेनाखासखेल समशेरबहादुर यांचे विद्याप्रसारादि गुणांच्या चिरकाल स्मरणार्थ श्रीसयाजीविजय आबालवृद्ध स्त्रीपुरुषांच्या सतत उपयोगी पडणारे साप्ताहिक वर्तमानपत्र”. यावरून ‘सयाजीविजय’ मधील बातम्यांच्या मजकुराच्या आशयाची कल्पना येते. हे साप्ताहिकसुद्धा मराठी, इंग्रजी व गुजराथी या तिन्ही भाषेत निघत होते. सयाजीविजय हे कट्टर सत्यशोधक विचारांचे नसले तरी यात सत्यशोधक समाज व चळवळीच्या संदर्भातील मजकूर यात प्रसिध्द होत असत. १८९६ नंतर ते गुजराथी व मराठी अशा दोनच भाषांमधून प्रसिद्ध होऊ लागले. या पत्राने चांगला लौकिक मिळवला.

याचा खप दहा हजारपर्यंत गेला होता यावरून त्याच्या लोकप्रियतेची कल्पना येते. यासंदर्भात यंदे म्हणतात, “या उत्कर्षाचे सर्व श्रेय श्री. महाराजांकडे आहे. याचे कारण असे कीं, श्रीसयाजीविजय पत्रात येणारा मजकूर महाराज स्वत: वाचतात व त्यातील सूचनांची चौकशी लवकर होऊन लोकांच्या गाऱ्हाण्यांची दाद लागते. ही परिस्थिती लोकांच्या लक्षात येतांच, लोकांत वर्तमानपत्र वाचण्याची गोडी उत्पन्न झाली व पत्राच्या हजारों प्रती खपूं लागल्या.” जागृतिकार भगवंतराव पाळेकर यांच्या जडणघडणीवर ‘श्रीसयाजीविजय’मधील लेखनाचा मोठा प्रभाव होता. ‘सयाजीविजय’ हे मराठी लोकांचे खूप आवडते वर्तमानपत्र ठरले होते. विशेष म्हणजे १९५० च्या सुमारास ‘सयाजीविजय’ छापणारी यंत्रसामग्री लोकसत्ता, जनसत्ता या पत्रकाने विकत घेतली.

## जागृति साप्ताहिक

२५ ऑक्टोबर १९१७ रोजी मराठा शिक्षण परिषदेच्या प्रचारकार्यासाठी भगवंतराव पाळेकरांनी बडोदा येथून ‘जागृति’ नावाचे साप्ताहिक सुरू केले. ‘जागृति’मध्ये अग्रलेख, विविध विषयांवरील स्फुट लेख, स्फुट विचार, पोच, अभिप्राय इ.चा समावेश असे. ‘जागृति’ हे समतोल विचारांचे साप्ताहिक होते. ‘जागृति’मध्ये स्थानिक प्रश्नांबरोबरच महाराष्ट्रातील घडामोडींचा आढावा प्रसिद्ध होत असे. ‘जागृति’ने राजकीय,

सामाजिक, आर्थिक, धार्मिक विषयांवर निर्भीड व स्पष्टपणे आपली मते मांडली. शेतकरी, कारागीर, मजूर व शिपाई या वर्गाच्या हितसंवर्धनाचे लेखन सातत्याने केले. स्पृश्यास्पृश्य, जातिभेद, जरठकुमारी विवाह इत्यादी अनिष्ट सामाजिक प्रथांच्या निर्मूलनाची भूमिका घेतली. विठ्ठल रामजी शिंदे जागृतिमधून लिहीत होते. सत्यशोधक ब्राह्मणेतर परिषदांचे अहवाल व वृत्तांत इ. संबंधीचा मजकूरदेखील जागृतिमधून प्रकाशित होत असे.

बडोद्यासारख्या गुजराथी भाषिक प्रदेशात स्वतंत्र बाण्याने, तत्त्वनिष्ठा, बहुजननिष्ठा व स्पष्टवक्तेपणाशी तडजोड न करता सत्यशोधक विचाराचे पत्र भगवंतराव पाळेकरांनी सलग बत्तीस वर्षे चालवून ध्येयवेड्या पत्रकारितेचा मानदंड निर्माण केला. सयाजीरावांनी बडोद्यात निर्माण केलेल्या निखळ अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा फायदा जागृतिला झाला. या संदर्भात जागृतिकार भगवंत पाळेकर यांनी नोंदविलेले निरीक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. पाळेकर म्हणतात, “राजकीय दृष्टीने बडोद्याच्या प्रजेला श्रीमंत सयाजीरावांच्या कारकीर्दीत सर्व हिंदुस्थानात डोके वर काढून फिरता येत असे. येथे कोणत्याही पुढाऱ्याच्या येण्याजाण्यावर प्रतिबंध नसे. यासंबंधाने महाराजांचा असा एक हुकूम होता की, बडोद्यातील कोणाच्याही घरी कोणी नामांकित पाहुणा आला तर त्याची खबर ताबडतोब राजवाड्यात पोहोचवावी

म्हणजे सवडीप्रमाणे महाराज त्या पाहुण्यांची भेट घेतील. तसेच कोणत्याही वर्तमानपत्राबाबत येथे केव्हाही बंदी घालण्यात आलेली नव्हती. बडोद्याबाहेरील ब्रिटिश हद्दीतील सरकारला अप्रिय असलेले लोक तर बडोद्यास येऊन स्वस्थतेने राहत.” असे स्वातंत्र्य आजही मिळणे दुरापास्त झाले आहे.

## बडोद्याचे वृत्तपत्र स्वातंत्र्य

बडोदा संस्थानाने १९०९ मध्ये ‘पुढारी’ वर्तमानपत्र सुरू करण्यास परवानगी दिली. व्ही. पी. साठे याचे संपादक म्हणून कार्यरत होते. पुढरीमध्ये वारंवार ब्रिटिश सरकारच्या विरोधातील मजकूर प्रकाशित होत असून देखील सयाजीराव महाराज पुढारीच्या संपादकांवर कारवाई न करता केवळ नामधारी समज देत. १९१० मध्ये ‘चाबूक’ या वृत्तपत्रातसुद्धा आक्षेपार्ह लेख छापल्याबद्दल ब्रिटिश सरकारकडून आक्षेप घेण्यात आला होता. यानंतरही ‘चाबूक’मध्ये ब्रिटिश विरोधी लेख प्रकाशित होत राहिले. त्यामुळे अखेरीस हिंदुस्तान सरकारच्या हस्तक्षेपाने ही दोन्ही वृत्तपत्रे बंद करण्यात आली. तसेच ‘बडोदा गॅझेट’मध्ये बादशहाच्या हिंदुस्थान भेटीच्या संदर्भात टीका करणारा आक्षेपार्ह मजकूर प्रकाशित केला होता. तरीदेखील बडोदा सरकारने ‘बडोदा गॅझेट’ वर कोणतीही कारवाई केली नाही. वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याबाबत ब्रिटीश भारतात जे ब्रिटिश सरकारचे कायदे

होते त्याला बडोदा संस्थान अपवाद होते. कारण बडोदा संस्थानातील स्वतंत्र वृत्तपत्र धोरणामुळे बडोद्यातील वृत्तपत्रे ब्रिटिश सरकारच्या कोणत्याही बंधनात न राहता स्वतंत्रपणे आपली पत्रकारिता करत होती.

## बडोदा कॉलेजचे नियतकालिक : एक अभिनव उपक्रम

येथे विशेष नोंद घेण्यासारखी बाब म्हणजे तत्कालीन ५६५ देशी संस्थानिकांमध्ये संस्थानतर्फे कॉलेज सुरू करणारे बडोदा हे भारतातील पहिले संस्थान होते. १८७९ मध्ये बडोदा कॉलेजची पायाभरणी झाली. या महाविद्यालयातील विद्यार्थांकडून कॉलेज नियतकालिक दरमहा प्रकाशित करण्याचा उपक्रम १८९५ मध्ये सुरू झाला. या नियतकालिकाचे संपूर्ण काम विद्यार्थी करत असत. संपादक म्हणून विद्यार्थ्यांची नावे मुखपृष्ठावर छापली जात. या नियतकालिकाला वार्षिक वर्गणीदार होते. व्यावसायिक नियतकालिकाच्या धर्तीवर याचे काम चालत असे. १९१७ मध्ये या नियतकालिकाच्या संपादक मंडळात एक मुलगीही होती. ही बाब तर त्याहूनही क्रांतिकारक मानवी लागेल कारण याच वर्षी शाहू महाराजांच्या सुनबाई इंदुमतीदेवी यांना लग्नांनंतर लगेचच वैधव्य आले. त्यावेळी त्यांना शिकवण्यासाठी शाहू महाराजांसारख्या क्रांतिकारक सुधारकाला संघर्ष करावा लागला. त्यामुळे बडोदा कॉलेजमधील

स्त्रीसहभाग अधिकच नजरेत भरतो. आजही एखाद्या महाविद्यालयाने नियमितपणे असे व्यावसायिक नियतकालिक चालविण्याचे उदाहरण भारतात आढळत नाही. यावरून बडोदा उर्वरित भारताच्या १२० वर्षे पुढे होता हे लक्षात येईल. १८९५ ला या मासिकाची पृष्ठसंख्या ४४ होती व ते इंग्रजीतून निघत होते. तर १९३२ मध्ये या नियतकालिकाची पृष्ठसंख्या १२० वर गेली. या नियतकालिकात १९३२ मध्ये इंग्रजीबरोबर संस्कृत, मराठी, हिंदी, गुजराथी, उर्दू या पाच भाषेतील मजकूर छापला जात होता. एकूण सहा भाषेतील मजकूराचा समावेश असणारे हे आजअखेर भारतातील एकमेव नियतकालिक असावे.

बडोदा कॉलेजमधील तुलनात्मक धर्म अभ्यास अध्यासनातर्फे 'इंडियन फिलॉसॉफीकल रिव्ह्यू' आणि 'इंडियन जर्नल ऑफ सोशिओलॉजी' ही दोन त्रैमासिके प्रकाशित होत होती. 'इंडियन फिलॉसॉफीकल रिव्ह्यू' चे संपादन विजेरी करत होते. जुलै १९१७ मध्ये 'इंडियन फिलॉसॉफीकल रिव्ह्यू' चा पहिला अंक प्रकाशित झाला. ते चार वर्षे चालले. या अध्यासनाबरोबरच बडोदा सेंट्रल लायब्ररीचा संस्कृत विभाग गायकवाड ओरिएंटल सिरिजच्या माध्यमातून या कामाला पूरक काम करत होता. या मालेचे पहिले संपादक पंडित चिमनलाल हे होते. बडोद्याच्या प्राच्यविद्या संस्थेचे मुखपृष्ठ असणारे 'Journal

of Oriental Institute' हे इंग्रजी नियतकालिक १९५१ मध्ये सुरू करण्यात आले. तर १९६२ मध्ये सुरू करण्यात आलेले 'स्वाध्याय' हे गुजराथी नियतकालिक बडोद्याच्या बौद्धिक श्रीमंतीचा पुरावा देते.

## व्यायाम मासिक

व्यायाम या विषयाला वाहिलेले मराठीतील पहिले मासिक १९१५ मध्ये 'व्यायाम' या नावाने आबासाहेब मुजुमदार यांच्या संपादनाखाली सुरू केले. हे मासिक ४३ वर्षे बडोद्यात सुरू होते. ते मराठी बरोबरच गुजराथी, हिंदी आणि इंग्रजी अशा तिन्ही भाषेत निघत होते. विद्यार्थ्यांसाठी 'व्यायाम' मासिक फारच उपयुक्त असल्याने याच्या ५०० प्रती बडोदा संस्थानातील शाळांना घेण्याचा हुकूम सयाजीरावांनी काढला होता. महाराजांकडून मिळालेला हा पाठिंबा या मासिकासाठी उपकारक ठरला. याच आबासाहेब मुजुमदारांनी १० खंडात प्रकाशित केलेला 'व्यायामकोश' हा आजही मराठीतील व्यायामासंदर्भातला एकमेव कोश आहे. या कामाला सयाजीरावांनी भक्कम आर्थिक पाठबळ दिले नसते तर मुजुमदारांना हे काम शक्य झाले नसते असे स्वतः मुजुमदारांनी नोंदविले आहे.

## शेती व सहकारविषयक नियतकालिके

सयाजीरावांनी संस्थानातील सहकार क्षेत्राच्या विकासासाठी सुद्धा स्वतंत्र नियतकालिके सुरू केली होती. यामध्ये १९२७-२८ दरम्यान सहकार खात्याचे अधिकृत मुखपत्र म्हणून 'ग्रामजीवन' हे त्रैमासिक सुरू केले. हे सुद्धा सहकार विषयाला वाहिलेले मराठीतील पहिले नियतकालिक आहे. यातून सहकार चळवळीबाबतची ध्येय-धोरणे जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम यशस्वीपणे पार पाडले. तसेच 'ग्रामजीवन'च्या माध्यमातून ग्रामीण पुनर्निर्माणाशी संबंधित सहकार खात्याचे निर्णय व संस्थानची सहकारविषयक धोरणे लोकांपर्यंत पोहोचत. सयाजीरावांनी 'ग्रामजीवन'प्रमाणेच 'शेती व सहकार्य' या त्रैमासिकाचेदेखील प्रकाशन सुरू केले. हे त्रैमासिक गुजराथी भाषेत प्रकाशित होत असे. या त्रैमासिकाच्या माध्यमातून सहकाराबरोबरच कृषीसंबंधित विविध विषयांच्या माहितीचा समावेश होता. शेतकऱ्यांना शेतीसंदर्भातील विविध विषयांची माहिती उपलब्ध करून देण्यासाठी १९२७-२८ मध्ये सहकार खात्याने 'कृषी दिनदर्शिका' प्रकाशित केली. त्यानुसार पुढील कामकाज सुरू झाले. महाराजांनी उत्तम पत्रकारितेच्या माध्यमातून संस्थानात आदर्शवत कार्य उभे केले.

शेती, सहकार, व्यायाम, उद्योग, आरोग्य, प्राच्यविद्या इ. विविध क्षेत्रातील अचूक ज्ञान नियतकालिकांच्या माध्यमातून प्रजेपर्यंतपोहोचवूनप्रजेलाज्ञानीबनविले.सयाजीरावांनीमाहिती आणि प्रबोधनाचा अचूक मेळ घालत वृत्तपत्रांच्या माध्यमातून स्वातंत्र्य चळवळीला अप्रत्यक्षपणे पाठबळ दिले. बडोदा संस्थानात एक आदर्शवत असे पत्रकारितेचे मूर्तिमंत उदाहरण महाराजांनी या क्षेत्रात निर्माण केले. सयाजीरावांनी पत्रकारितेला पाठबळ देत असताना वृत्तपत्रांबरोबरच साहित्य, संस्कृती, धर्म, आरोग्य, शेती, सहकार अशा विविध आणि समाजाच्या चौफेर विकासाला बळ देणाऱ्या नियतकालिकांनाही पाठबळ दिले ही बाब १०० वर्षांपूर्वी जेवढी नावीन्यपूर्ण होती तितकीच आजही नवी वाटावी अशी आहे.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
 - धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
 - धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
 - सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
 - दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
 - डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
 - सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
 - पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
 - बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव ‘प्रजासत्ताक’ राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सयाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
 - बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Spechess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद

कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com